मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि.4 ऑगस्ट 2025 | पान- 1

# महानगरपालिकेचा विकास आराखडा होणार मराठीत

## राज्य शासनाच्या आयुक्तांना सूचना : मराठी भाषा टाळली असल्याचा आरोप नागरिकांनी केला होता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नवीन विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे. हा आराखडा महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. त्यावर हरकती व सूचना घेण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. मुदतीमध्ये ४९ हजार ६०० हरकती प्राप्त झाल्या. मात्र, आराखडा इंग्रजी भाषेत असून मराठी भाषा सोयीस्करपणे टाळली असल्याचा आरोप नागरिकांनी केला होता. इंग्रजी भाषेत असलेला विकास आराखडा मराठीमध्ये प्रसिद्ध करण्याची सूचना राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिली आहे.



सामान्य मराठी भाषिक नागरिकांना इंग्रजी भाषेमुळे या मसुद्याचे पूर्ण व अचूक आकलन झालेले नाही. विकास आराखडा मराठी भाषेत असता तर हरकती व सूचना घेणाऱ्या नागरिकांची संख्या आणखी वाढली असती. तसेच महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४, कलम ४(१) अन्वये राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी मराठी भाषेत सर्व अधिकृत व्यवहार, कागदपत्रे व अहवाल प्रकाशित करणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१, कलम ४(२) मध्ये सुधारणा करून, शासनाने सर्व महापालिका, नगरपरिषदांना मराठीतून प्रशासकीय कामकाज करण्याचे आदेश दिलेले आहेत, असे असतानाही महापालिकेच्या नगररचना विभागाने विकास आराखडा इंग्रजी भाषेमधून तयार केला आहे. हा आराखडा सर्वसाधारणपणे अभियंते, वास्तुविशारद, वकील किंवा या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींनाच ज्ञात होईल.

ज्या सर्वसामान्य जनतेच्या जागा आहेत, त्यांना हा आराखडा समजला नाही. त्यामुळेच हा आराखडा मराठी भाषेमध्ये प्रसिद्ध करण्याची मागणी विधीचे विद्यार्थी अनीश काळभोर यांनी केली होती. तसेच मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी देखील राज्य शासनाकडे डीपी मराठी भाषेत करण्याची मागणी केली होती. अखेर नगरविकास विभागाने नियमानुसार कार्यवाही करण्याचे आदेश महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिले आहेत. त्यामुळे, शहराचा डीपी मराठी भाषेमध्ये येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, त्यासाठी नियुक्त केलेली खासगी संस्था हा डीपी मराठीमध्ये करून देणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नवीन विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे. हा आराखडा महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. त्यावर हरकती व सूचना घेण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. मुदतीमध्ये ४९ हजार ६०० हरकती प्राप्त झाल्या. मात्र, आराखडा इंग्रजी भाषेत असून मराठी भाषा सोयीस्करपणे टाळली असल्याचा आरोप नागरिकांनी केला होता.

> “महानगरपालिकेचा विकास आराखड्याचा संपूर्ण मजकूर व नकाशा अति-शुद्ध, प्रशासकीय स्तरावर अचूक अशा मराठीत भाषांतरित करून तो महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावा, अशी मागणी केली होती. तसेच छपाई स्वरूपात जनतेस उपलब्ध करून द्यावा. सर्व जनतेपर्यंत हा आराखडा पोहोचला जाईल याची प्रशासनाने सोय करणे अपेक्षित होते. मराठीमध्ये आराखडा असता तर नागरिकांना तो ज्ञात होऊन त्यावर आणखी हरकती आल्या असत्या. आता राज्य शासनाच्या आदेशानंतर तरी आयुक्तांनी आराखडा मराठीमध्ये प्रसिद्ध करावा.
>
> - अनीश काळभोर, विधी विद्यार्थी

# पोलिसांकडून 231 तक्रारदारांना सहा कोटींचा मुद्देमाल परत

## पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते नागरिकांना मुद्देमाल परत दिला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलिसांनी २३१ गुन्ह्यातील आरोपींना अटक करून त्यांच्याकडून हस्तगत केलेला सहा कोटींचा मुद्देमाल तक्रारदारांना परत मिळवून दिला. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते नागरिकांना परत दिला. त्यामुळे संबंधित नागरिकांचे चेहरे आनंदाने खुलले. यामध्ये १७ लाख रुपये किंमतीचे ३३ तोळे सोन्याचे दागिने, ४१ लाख रुपये किंमतीच्या सहा मोटारी, पाच कोटी १५ लाख रुपयांची रोख रक्कम आणि ३० लाख रुपयांचे १६७ मोबाइल संच मूळ मालकांना देण्यात आले.



निगडी येथील पोलीस मुख्यालयात शनिवारी मुद्देमाल परत वितरण कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, पोलीस उपायुक्त डॉ.शिवाजी पवार, बापू बांगर, संदीप आटोळे, सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक तसेच सुमारे २५० नागरिक उपस्थित होते. पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल झाल्यानंतर तपासादरम्यान पोलिसांकडून आरोपींना अटक करून त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला जातो. न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधित फिर्यादींना त्यांचा मुद्देमाल परत दिला जातो.

### हा मुद्देमाल केला परत..

- 33 तोळे सोन्याचे दागिने (17 लाख रुपये किंमत)
- 6 मोटार वाहने (41 लाख रुपये किंमत)
- 5 कोटी 15 लाख रुपयांची रोख रक्कम
- 167 मोबाईल हँडसेट्स (30 लाख रुपये किंमत)

मुद्देमाल परत मिळाल्यामुळे फिर्यादींनी समाधान, आनंद व कृतज्ञता व्यक्त केली. नागरिकांनी पोलीस विभागाच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले. अशा उपक्रमामुळे जनतेचा पोलीस यंत्रणेवरचा विश्वास अधिक बळकट होत असल्याचे सांगितले. त्यांनी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे तसेच संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले. सायबर पोलीस ठाण्याने पाच कोटी पाच लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून गुन्ह्यातील फिर्यादींना परत केला. तसेच केंद्र शासनाच्या सीईआयआर पोर्टलवर हरवलेले मोबाईल नोंदवल्यानंतर पोलिसांनी त्यांचा शोध घेऊन एकूण १६७ मोबाईल जप्त करून संबंधित तक्रारदारांना परत केले.

# पुणे विभागातील सोळा अपघातप्रवण ठिकाणे कोंडीमुक्त...

## महामार्गांवरील 22 पैकी 16 अपघातप्रवण ठिकाणे वाहतूक कोंडीमुक्त झाली असल्याचा दावा ‘एनएचएआय’कडून करण्यात आला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या (एमओआरटीएच) माध्यमातून पुणे विभागातील महामार्गांवरील अपघातप्रवण क्षेत्रांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या महामार्गांवरील २२ पैकी १६ अपघातप्रवण ठिकाणे वाहतूक कोंडीमुक्त झाली असल्याचा दावा ‘एनएचएआय’कडून करण्यात आला आहे. उर्वरित सहा ठिकाणांवरील कामे मंजुरी आणि निविदा प्रक्रियेच्या प्रतीक्षेत असून, लवकरच ती पूर्ण करण्यात येणार आहेत.

अपघातप्रवण ठिकाणांमध्ये पुणे-सातारा महामार्ग (एनएच ४८), पुणे-सोलापूर (एनएच ९६५ पालखी मार्ग) आणि पुणे-नाशिक फाटा (खेड विभाग) मार्ग या तीन राष्ट्रीय महामार्गांचा समावेश आहे. या ठिकाणी रस्त्यांवर सातत्याने अपघात आणि वाहतूककोंडी होत असल्याचे समोर आले होते. त्यामुळे या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना करून संबंधित १६ ठिकाणी वेगमर्यादेसाठी सीसीटीव्ही नियंत्रण, वेगक्षमता कालमापक निश्चिती, रम्बल स्ट्रिप्स, फलक, पर्यायी सेवा रस्ते आदी दुरुस्ती करण्यात आली आहे.

‘पुणे विभागातील महामार्गांवर अपघातप्रवण ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून, २२ ठिकाणे निश्चित करण्यात आली होती. या ठिकाणी वारंवार अपघात होणे, वाहतूककोंडीसारख्या समस्या प्रकर्षाने समोर आल्या होत्या. संबंधित ठिकाणांवर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना सुलभ प्रवास करण्यासाठी रस्तेमार्ग उपलब्ध करून देण्यासाठी पुणे-पिंपरी चिंचवड महापालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि स्थानिक संस्थांच्या समन्वयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार महामार्गांवर अपघातप्रवण ठिकाणे प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे,’ अशी माहिती ‘एनएचएआय’चे प्रकल्प संचालक संजय कदम यांनी दिली.

### पुणे-नाशिक मार्गावरील अतिक्रमणांवर कारवाई

» पुणे-नाशिक महामार्ग (खेड परिसर), नाशिक फाटा, मोशी चौक, आळंदी फाटा, मरकळ फाटा, चिंबळी फाटा, चाकण एमआयडीसी रस्ता चौक, कुरुळी फाटा, राजगुरूनगर बायपास चौक आदी ठिकाणी अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत. रस्त्यांवर पडलेले खड्डे दुरुस्त करून रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. तसेच, वेगमर्यादेसाठी गतिरोधक निर्माण करण्यात आले आहेत.

### पालखी महामार्गावरील कामे

» पालखी महामार्गावर सासवड फाटा, जेजुरी, वाल्हे, लोणंदसारख्या गावांजवळ पदपथांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली होती. ती काढण्यात आली. या ठिकाणी वेग नियंत्रक, रस्ते रेखांकन, डिजिटल फलक आणि पुरेपूर प्रकाशव्यवस्था अशा उपाययोजना केल्या आहेत.

### पुणे-सातारा रस्त्यावरील उपाययोजना

» पुणे-सातारा महामार्गावरील नवले पूल, वारजे चौक, वडगाव पूल आणि कात्रज बोगद्याजवळ रस्त्यांची वळण रचना व वाहतूककोंडी ही अपघातांची प्रमुख कारणे होती. तसेच, वडगाव पूल, खेड शिवापूर टोल प्लाझा, भोर फाटा, कात्रज बोगदा ते नवा कात्रज बोगदा, कात्रज घाट प्रवेशद्वार, कात्रज घाटातून बाहेर पडणाऱ्या भागांवर अपघातजन्य परिस्थिती होती. ती दूर करण्यासाठी येथे महामार्ग प्राधिकरणाने सेवा रस्ते, मार्गिका संक्रमण, ‘क्रॅश बॅरिअर्स’, ‘रिफ्लेक्टिव्ह साइनबोर्ड’, ‘रम्बल स्ट्रिप्स’ आणि सुधारित प्रकाशव्यवस्था अशा उपाययोजना केल्या. त्यामुळे या ठिकाणी अपघाताचा धोका कमी झाला असून, वाहतुकीचा वेग सुधारत आहे.

# भूमिपुत्रांवर अन्याय होणार नाही – पुरंदर विमानतळ भूसंपादनाबाबत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची ग्वाही

## पुरंदरमधील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी राज्य सरकारने भूसंपादनाची कार्यवाही सुरू केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदरमधील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी राज्य सरकारने भूसंपादनाची कार्यवाही सुरू केली आहे. त्यात भूमिपुत्रांवर अन्याय होणार नाही. प्रत्येकाला विश्वासात घेऊन प्रकल्प पूर्ण केला जाईल,’ अशी ग्वाही केंद्रीय सहकार आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शनिवारी दिली.

बारामती येथे पंतप्रधान किसान सन्मान निधीचे वाटप मोहोळ यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी जेजुरीच्या खंडोबा गडावर अभिषेक आणि महापूजा केली. त्या वेळी पत्रकारांशी बोलताना मोहोळ म्हणाले, ‘पुरंदर येथे विमानतळाची अत्यंत आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी विमानतळासाठी भूसंपादनाचा निर्णय घेतला आहे.

देशात कोठेही विमानतळ करायचे असेल, तर राज्य सरकारला जागा द्यावी लागते. त्याप्रमाणे राज्य सरकार भूसंपादन करील. ते करताना कोणत्याही भूमिपुत्रावर, शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही. सर्वांना विश्वासात घेऊनच भूसंपादन होईल. शेतकऱ्यांशी योग्य समन्वय साधण्याचे काम येथील लोकप्रतिनिधींनी केले पाहिजे. सर्वांना विश्वासात घेणे महत्त्वाचे आहे.’

बारामती येथील कार्यक्रमात मोहोळ म्हणाले, ‘पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना २०१९ पासून सुरू करण्यात आली आहे. देशभरात २०० पेक्षा अधिक ठिकाणी हा कार्यक्रम झाला आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या खात्यात वर्षाला सहा हजार रुपये आणि राज्य सरकार नऊ हजार रुपये असे १५ हजार रुपये जमा करत आहे. काँग्रेस सरकारच्या काळात हे होत नव्हते. काँग्रेसच्या काळात सरकारने शेतकऱ्यांसाठी एक रुपया दिला, तर ८५ पैसे कुठे जात होते, ते समजत नव्हते. आता मोदी सरकारच्या काळात रुपया असला, तरी तो लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत आहे.’

जगताप यांच्या सासवड येथील घरी मोहोळ यांनी भेट दिली. या वेळी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष साकेत जगताप, माजी आमदार अशोक टेकवडे, तसेच जालिंदर कामठे, रंजन तावरे, भाजप जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे, खंडोबा देवस्थानाचे मुख्य विश्वस्त मंगेश घोणे, विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर, अॅड. पांडुरंग थोरवे, अॅड. विश्वास पानसे, गिरीश जगताप, भाजप शहराध्यक्ष सचिन पेशवे, अलका शिंदे, सचिन सोनवणे आदी उपस्थित होते.



### पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या घरी भेटी

» मुरलीधर मोहोळ यांनी या दौऱ्यामध्ये पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या घरी, कार्यालयात भेटी दिल्या. निरा येथे भाजप कार्यकर्ते संजय निगडे यांच्या घरी, तर माळेगाव येथे रंजन तावरे यांच्या कार्यालयात त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यानंतर जेजुरी येथे भाजपचे शहराध्यक्ष सचिन पेशवे यांच्या घरी भोजन केले. भाजपमध्ये प्रवेश केलेले पुरंदरचे काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप मोहोळ यांच्या दौऱ्यात सहभागी होते.

# पिंपरीत अवजड वाहनांच्या प्रवेशाच्या वेळेत वाढ

## सकाळी आठ ते बारा, दुपारी चार ते रात्री नऊपर्यंत मनाई, वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी अवजड वाहनांच्या वाहतुकीची वेळ निश्चित...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या वाहतूककोंडीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहरात प्रवेश करणाऱ्या अवजड वाहनांच्या वेळेत दोन तासांनी वाढ केली. यापूर्वी सकाळी आठ ते ११ आणि सायंकाळी पाच ते नऊ या वेळेत वाहनांना प्रवेशास मनाई होती. आता सकाळी आठ ते १२ आणि दुपारी चार ते रात्री नऊपर्यंत प्रवेशास मनाई करण्यात आली आहे. याबाबतचा आदेश वाहतूक विभागाचे उपायुक्त विवेक पाटील यांनी दिला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये चाकण, भोसरी, म्हाळुंगे, तळेगाव दाभाडे ही औद्योगिक क्षेत्रे असून, हिंजवडी, तळवडे आयटी पार्क आहे. श्रीक्षेत्र देहूगाव, आळंदी ही धार्मिक स्थळे असून, येथे वारकरी संप्रदायातील लोकांचा वर्षभर मोठ्या प्रमाणावर वावर असतो. आयुक्तालयांतर्गत मोठमोठ्या बाजारपेठा, शैक्षणिक संकुले, दवाखाने आहेत. शहरातून जुना मुंबई-पुणे, बंगळुरू-मुंबई व पुणे-नाशिक महामार्ग असे महत्त्वाचे महामार्ग जात आहेत. पिंपरी महापालिका भवन ते भक्ती-शक्ती दरम्यान विस्तारित मेट्रो मार्गिकेचे काम सुरू आहे. हिंजवडी येथे मेट्रोचे काम प्रगतिपथावर आहे. शहराचा विस्तार झपाट्याने होत असल्याने वाहतुकीच्या साधनांत वाढ होऊन वाहनांच्या संख्येतही प्रचंड वाढ झाली आहे.



### कोणत्या वेळी मनाई?

» तळवडे, निगडी, चिंचवड, भोसरी, हिंजवडी, सांगवी, वाकड, बावधन, पिंपरी, देहूरोड विभागासह म्हाळुंगेतील ह्युंडाई सर्कल ते खालुंब्रेतील जाणे-येणे आणि चाकणमधील शिक्रापूर बाजूकडून चाकणमार्गे तळेगाव बाजूकडे जाण्यास व तळेगावकडून चाकणमार्गे शिक्रापूरकडे येण्यास सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना सकाळी आठ ते बारा आणि दुपारी चार ते रात्री नऊ वाजेपर्यंत प्रवेशास मनाई करण्यात आली आहे.भोसरी विभागातील वाहनांना सकाळी सात ते बारा व दुपारी चार ते रात्री दहा वाजेपर्यंत आणि तळेगाव वाहतूक विभागात सकाळी सात ते दुपारी दोन आणि दुपारी चार ते सात वाजेपर्यंत अवजड वाहनांना प्रवेशास मनाई केली आहे.

### तळवडे, दिघी, आळंदी विभागात अवजड वाहनांना पूर्णवेळ बंदी

» दिघी, दिघी-आळंदी, तळवडे वाहतूक विभागात अवजड वाहनांना पूर्णवेळ वाहतूक बंदी करण्यात आली आहे. जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणारे ट्रक, दुधाचे टँकर, सैन्य दलाच्या मोठ्या वाहनांना यातून वगळण्यात आले आहे.

> अवजड वाहनांना प्रवेशास मनाई केल्यानंतरही कोंडीत फरक पडलेला नाही. त्यामुळे प्रवेश बंदीच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे.
>
> - विवेक पाटील, पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग.

वाहतूककोंडी होऊ नये यासाठी अवजड वाहनांच्या वाहतुकीची वेळ निश्चित केली होती. काही ठिकाणी पूर्णवेळ प्रवेश बंदी करण्यात आली असून, काही ठिकाणी सकाळी आठ ते ११ आणि सायंकाळी पाच ते नऊ या वेळेत अवजड वाहनांना प्रवेशास मनाई केली होती. त्यानंतरही अवजड वाहनांमुळे वाहतूककोंडीत भर पडत आहे. त्यामुळे प्रवेश बंदीच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे. आता सकाळी आठ ते बारा आणि दुपारी चार ते रात्री नऊ वाजेपर्यंत अवजड वाहनांस प्रवेशास मनाई करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या वाहतूककोंडीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहरात प्रवेश करणाऱ्या अवजड वाहनांच्या वेळेत दोन तासांनी वाढ केली. यापूर्वी सकाळी आठ ते ११ आणि सायंकाळी पाच ते नऊ या वेळेत वाहनांना प्रवेशास मनाई होती. आता सकाळी आठ ते १२ आणि दुपारी चार ते रात्री नऊपर्यंत प्रवेशास मनाई करण्यात आली आहे.

# चिंचवडच्या पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर काय आहे तोडगा? किती आणि कधी मिळणार दिलासा?

## पवना नदीवरील रावेत येथे नवीन बंधारा बांधण्याच्या महापालिकेच्या मागणीला जलसंपदा विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराला पुरेशा प्रमाणात पाणी मिळावे, यासाठी पवना नदीवरील रावेत येथे नवीन बंधारा बांधण्याच्या महापालिकेच्या मागणीला जलसंपदा विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. नवीन बंधारा उभारणीस ९० कोटी रुपयांचा खर्च असून, तो देण्याची मागणी जलसंपदा विभागाने महापालिकेकडे केली आहे.

गेट असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित या बंधाऱ्यामुळे तीन दिवस पुरेल इतका जलसाठा उपलब्ध राहील, असा महापालिकेचा दावा आहे. पवना धरणातून सोडलेले पाणी रावेत बंधाऱ्यावरून उचलले जाते. हा बंधारा जुना असून, जीर्ण झाला आहे. महापालिका येथून ५२० दशलक्ष लिटर (एमएलडी) अशुद्ध जलउपसा करते. निगडी, सेक्टर क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी आणले जाते. तेथे पाणी शुद्ध करून शहराला वितरित केले जाते. रावेत बंधाऱ्यास गेट नसल्याने गाळ, घाण, जलपर्णी, तसेच औद्योगिक कचरा व सांडपाणी तेथेच साचून राहते. दुर्गंधीही निर्माण होते. बंधाऱ्याच्या परिसरात अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात गाळ, कचरा साचला आहे.

गाळ न काढल्याने पाणी साठवण क्षमताही कमी झाली आहे. एक दिवस पुरेल इतके पाणी साठते. तांत्रिक बिघाड झाल्यास, उशिराने पाणी आल्यास पाणीपुरवठा विभागाचे नियोजन कोलमडते. अधिकचा पाणीसाठा राहावा, यासाठी नवीन बंधारा बांधण्याची मागणी महापालिकेने जलसंपदा विभागाकडे केली होती. जलसंपदा विभागाने नवीन बंधाऱ्याचे चार प्रकारचे डिझाइन तयार केले आहे. त्यापैकी एका डिझाइनला सहमती द्यावी, बंधारा उभारणीसाठी ९० कोटी रुपयांचा खर्च द्यावा, असे पत्र जलसंपदा विभागाने नुकतेच महापालिकेला दिले आहे.

नवीन बंधाऱ्यामुळे तीन दिवस पुरेल इतका पाणीसाठा उपलब्ध राहील. बंधाऱ्यास गेट असल्याने गाळ व कचरा वाहून जाऊन नदी स्वच्छ राहण्यास मदत होईल. महापालिकेने रक्कम दिल्यानंतर आणि पावसाळा संपल्यानंतर जलसंपदा विभागाकडून प्रत्यक्ष काम सुरू केले जाईल, असे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले.




### पावसाळ्यानंतर कामाला सुरुवात

» मुळा-मुठा नदीवर पुण्यातील बंडगार्डन येथे गेट असलेला अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित बंधारा आहे. त्याप्रमाणे बंधारा बांधण्यास महापालिकेने तत्त्वतः सहमती दिली आहे. नवीन बंधाऱ्यामुळे तीन दिवस पुरेल इतका पाणीसाठा उपलब्ध राहील. बंधाऱ्यास गेट असल्याने गाळ व कचरा वाहून जाऊन नदी स्वच्छ राहण्यास मदत होईल. महापालिकेने रक्कम दिल्यानंतर आणि पावसाळा संपल्यानंतर जलसंपदा विभागाकडून प्रत्यक्ष काम सुरू केले जाईल, असे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले.

> जलसंपदा विभागाकडून रावेत येथे नवीन बंधारा बांधण्याबाबत पत्र आले आहे. त्यासाठी ९० कोटी रुपयांची मागणी केली आहे. आयुक्तांची मंजुरी घेऊन जलसंपदा विभागाला कळविले जाईल. बंधारा झाल्यानंतर शहराला तीन दिवस पुरेल इतका पाणीसाठा रावेत येथे उपलब्ध होईल.
>
> - अजय सूर्यवंशी, सहशहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# दोनशे पेक्षा जास्त बळी गेल्यावर एनएचआयला आली जाग

## पुणे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील म्हसोबा फाटा येथे अंडर बायपास रस्त्याच्या मागणीला अखेर यश मिळाले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील म्हसोबा फाटा येथे अंडर बायपास रस्त्याच्या मागणीला अखेर यश मिळाले आहे. सातत्याने या प्रश्नावर आवाज उठविल्यानंतर आणि नागरिकांच्या आक्रोशाची दखल घेतल्यावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पुलाखालून रस्त्याचे काम सुरू केले आहे. या ठिकाणी मागील काही वर्षांत रस्ता ओलांडताना तब्बल 200 पेक्षा अधिक नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. तरीही याकडे प्रशासन, महामार्ग प्राधिकरण व शासनाने दुर्लक्ष केले होते.

अखेर प्राधिकरणाने जाग येत काम सुरू केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. म्हसोबा फाट्याजवळील अंडर बायपासची मागणी सोरतापवाडी, नायगाव, पेठ, कोरेगावमुळ, प्रयागधाम येथील ग्रामस्थांकडून गेल्या अनेक वर्षांपासून होत होती. पुणे-सोलापूर महामार्गावरून या गावांना जोडणारा हा मार्ग अत्यंत जवळचा असून, दररोज हजारो नागरिकांचा या भागातून प्रवास होतो. मात्र महामार्ग ओलांडताना जीवाला धोका निर्माण होत असल्याने अपघातांचे प्रमाण मोठे होते.

स्थानिक ग्रामपंचायती, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी वेळोवेळी प्रशासनाला निवेदने देऊन मागणी केली होती. मात्र ती दखल घेतली गेली नाही. दरम्यान, वाकडा पुल परिसर अत्यंत धोकादायक असल्याने याठिकाणी पथदिवे, झेब्रा क्रॉसिंग, गतिरोधक यांचीही आवश्यकता असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नागरिकांनी दैनिक प्रभातचे आभार मानले असून, या प्रश्नाकडे कोणीही लक्ष दिलं नसतं, जर प्रभातने आवाज उठवला नसता, तर आजही आम्ही रस्त्यावर बळी पडत राहिलो असतो, अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.

या कामासाठी आदर्श सरपंच सुरज चौधरी, सरपंच सुप्रिया चौधरी, माजी सरपंच तानाजी चौधरी, संध्या चौधरी, शोभा चौधरी, पुनम आढाव, माजी उपसरपंच युवराज चौधरी, रवींद्र गायकवाड, सुजित चौधरी, सुभाष कड, अमोल चौधरी, भाऊसाहेब चौधरी, देवेंद्र चौधरी, नवनाथ आढाव, पोलीस पाटील दत्तात्रय चौधरी यांच्यासह अनेकांनी सातत्याने पाठपुरावा केला.

पूर्व हवेली परिसरातही अनेक ठिकाणी अंडर बायपासची आवश्यकता आहे. लोणी काळभोर येथील बोरकर वस्तीजवळील ओढ्यावर अंडर बायपास शक्य आहे. उरुळी कांचन येथून डाळिंब गावाला जाण्यासाठी शेजारील पुलाखालून बायपासचे काम सुरू आहे. अशा उपाययोजनांमुळे वाहतुकीचा ताण कमी होतो.



### इतर ठिकाणांवरही अंडर बायपासची गरज..

**» पूर्व हवेली परिसरातही अनेक ठिकाणी अंडर बायपासची आवश्यकता आहे. लोणी काळभोर येथील बोरकर वस्तीजवळील ओढ्यावर अंडर बायपास शक्य आहे. उरुळी कांचन येथून डाळिंब गावाला जाण्यासाठी शेजारील पुलाखालून बायपासचे काम सुरू आहे. अशा उपाययोजनांमुळे वाहतुकीचा ताण कमी होतो, अपघातांना आळा बसतो आणि नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित होतो, असे मत सुभाष कड व भाऊसाहेब चौधरी यांनी व्यक्त केले.**

### स्थानीय प्रयत्नांना यश..

**» या कामासाठी आदर्श सरपंच सुरज चौधरी, सरपंच सुप्रिया चौधरी, माजी सरपंच तानाजी चौधरी, संध्या चौधरी, शोभा चौधरी, पुनम आढाव, माजी उपसरपंच युवराज चौधरी, रवींद्र गायकवाड, सुजित चौधरी, सुभाष कड, अमोल चौधरी, भाऊसाहेब चौधरी, देवेंद्र चौधरी, नवनाथ आढाव, पोलीस पाटील दत्तात्रय चौधरी यांच्यासह अनेकांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना आता यश लाभले आहे.**

# अशुद्ध पाणी पिल्याने ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात ; कारवाई न झाल्यास गावकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

## पेरणे येथे गावठाण, गावातील वाड्या, वस्त्यांवर आठ आरओ प्लांटचे पाणी दूषित असल्याचा आरोग्य विभागाचा अहवाल

**पुणे | प्रतिनिधी**

पेरणे (ता. हवेली) गावामध्ये ऐन पावसाळ्यात मागील काही दिवसांपासून गावठाण, वाड्या वस्त्यांवर व्यावसायिक आर. ओ. पिण्याचे पाणी प्लांटच्या माध्यमातून अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले असून, गावामध्ये ऐन पावसाळ्याच्या काळात साथीचे व इतरत्र अनेक आजार बळावल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र (सरकारी दवाखाना) पेरणे यांनी हा प्रकार उघडकीस आणल्याचे समोर आले आहे. गावामध्ये अनेक ठिकाणी पिण्याचे पाणी विकत देण्यासाठी आर. ओ. प्लांटची अधिक संख्या वाढत आहे.

पेरणे येथे गावठाण, गावातील वाड्या, वस्त्यांवर स्थानिक नागरिकांकडून व्यवसाय म्हणून आरओ पिण्याचे पाण्याचे प्लांट तयार करून उभारण्यात आले आहेत. पेरणे प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या वतीने आर. ओ. पाणी प्लांट वरील पाण्याची तपासणी चाचणी केली असता सुमारे 8 आर. ओ. प्लांटचे पिण्याचे पाणी अयोग्य अशुद्ध असल्याचे 28 जुलै रोजीचा राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांच्याकडून आलेल्या निष्कर्ष अहवालात निदर्शनास आले आहे. त्यामुळे ग्रामस्थांचा आरोग्याचा प्रश्न एरणीवर आला आहे.

याबाबत तक्रार करताना पेरणे गावचे माजी सरपंच निलेश वाळके यांनी सांगितले की, आर. ओ. प्लांट मालकांनी खराब पाणी ग्राहकांना विकून जनतेची फसवणूक केली आहे. आर. ओ. प्लांटवर पैसे देऊनही ते गावाला दूषित पाणी पाजत असून ते ग्रामस्थांच्या आरोग्याच्या जीवाशी खेळले आहे. त्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात येत असल्याने आम्ही गावातील ग्रामस्थांसोबत असून या दूषित पिण्याचे पाणी देणाऱ्या आर. ओ. प्लांटवर जर ग्रामपंचायत प्रशासन, आरोग्य खाते, अन्न व प्रशासन विभाग, आदी संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी जर त्वरित कडक कारवाई केली नाही तर आम्ही ग्रामस्थांना सोबत घेऊन तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडणार आहे.



**“वेगवेगळ्या साथीच्या आजारांचे रुग्ण वाढ झाल्यामुळे आम्ही पिण्याचे पाणी तपासणीचा निर्णय घेतला. त्यामध्ये 9 आर. ओ. पाणी प्लांट पैकी 8 प्लांट वरील पाणी अशुद्ध असल्याचे निदर्शनास आले. त्यांच्यावर जी काही कारवाई करण्याचे ते आम्ही पेरणे ग्रामपंचायतीला कळविले आहे.”**
**- डॉ. प्रज्ञा घोरपडे, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, पेरणे**

**“क्लोरीन पावडर वापरत नसतील याबाबत पाणी पुरवठा करून माहिती मागून घेतो, हे खासगी प्लांट आहे. शासकीय नियमानुसार ग्रामपंचायतीची चौकशी करू तर या विषयाबाबत मी ग्रामविकास अधिकारी व सरपंच याच्याशी बोलून घेतो. यावर पुढील कार्यवाही करू.”**
**- सुरेश गोरे, हवेली तालुका आरोग्य अधिकारी**